उमेदवारांसाठी महत्वाची सुचना

पोलीस अधीक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ ची मैदानी चाचणी हि दि. २०/०२/२०२६ ते दि. २६/०२/२०२६ दरम्यान घेण्यात आलेली आहे. सदर मैदानी चाचणी मध्ये सर्व उमेदवार यांना मिळालेल्या एकत्रित गुणांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रसिध्द करण्यात आलेल्या सदर एकत्रित गुणांच्या अनुषंगाने तसेच नाव, जन्म दिनांक, जात, समांतर आरक्षण, नॉन क्रिमीलीयर या बाबत उमेदवारांच्या काही हरकती/आक्षेप असल्यास त्या सविस्तरपणे दि. २७/०२/२०२६ रोजी २०:०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या sp.railway-abad@mahapolice.gov.in या ई-मेल आयडी वर लेखी अर्ज, स्वतःचे संपुर्ण नाव, संवर्ग, तात्पुरत्या यादीतील क्रमांक, आवेदन अर्ज क्रमांक, चेस्ट क्रमांक, मोबाईल क्रमांक व आक्षेपासंबंधीचे समर्थनिय कागदपत्रासह PDF फाईलमध्ये सादर करावेत. सदर वेळेनंतर प्राप्त कोणत्याही हरकती/आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व काहीही आक्षेप नसल्याचे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(स्वाती भोर)
पोलीस अधीक्षक
लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर